TATA
TATA POWER
टाटा पॉवर कंपनी लिमिटेड
**नोंदणीकृत कार्यालय:** बॉम्बे हाउस, २४, होमी मोदी मार्ग, मुंबई ४०० ००१. **दूरध्वनी** ९१ २२ ६६६५ ८२८२ **फॅक्स** ९१ २२ ६६६५ ८८०१
**सीआयएन:** एल२८९२०एमएच१९१९पीएलसी०००५६७ **वेबसाइट** www.tatapower.com **ईमेल:** tatapower@tatapower.com

# ग्राहकांच्या संपूर्ण मागणीसाठी १०० टक्के हरित ऊर्जा वापरण्याची त्यांची गरज पूर्ण करण्यासाठी नूतनक्षम ऊर्जेच्या पुरवठ्यासाठी ("हरित ऊर्जा दर") आकारण्याकरिता मान्यता मिळवण्याच्या टाटा पॉवर- वितरणाच्या याचिकेवर सूचना/आक्षेप [खटला क्रमांक. २०२० चा १३४]

१. दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड- वितरण (टाटा पॉवर-डी)ने टाटा पॉवर-डीची ग्राहकांच्या संपूर्ण मागणीसाठी १०० टक्के हरित ऊर्जा वापरण्याची त्यांची गरज पूर्ण करण्यासाठी नूतनक्षम ऊर्जेच्या पुरवठ्यासाठी **("हरित ऊर्जा दर")** आकारण्याकरिता मान्यता मिळवण्यासाठी याचिका दाखल केली आहे.

२. आयोगाने सदर याचिका १७ डिसेंबर २०२० रोजी दाखल करून घेतली आहे आणि टाटा पॉवर-डीला वीज कायदा २००३ च्या कलम ६४ (२) अंतर्गत जनतेकडून सूचना/ आक्षेप मागवण्यासाठी सार्वजनिक सूचना जारी करण्याचे निर्देश दिले आहेत.

३. या याचिकेची प्रमुख वैशिष्टे खाली दिल्याप्रमाणे आहेत:

- टाटा पॉवर-डीला काही ग्राहकांकडून आपली संपूर्ण मागणी फक्त नूतनक्षम ऊर्जेमार्फत (हरित ऊर्जा) त्या संदर्भात प्रमाणपत्र प्राप्त करून पूर्ण करण्यासाठी विनंती येत आहेत. त्यानुसार, टाटा पॉवर-डीने सदर ग्राहकांच्या १०० टक्के हरित ऊर्जेची गरज पूर्ण करण्यासाठी पद्धत आणि अशा ग्राहकांना लागू असलेले संबंधित दर प्रस्तावित करण्याची याचिका दाखल केली आहे.
- टाटा पॉवर वितरण ग्राहकाला एक मासिक प्रमाणपत्र जारी करेल. त्यात असे नमूद असेल की त्यांची १०० टक्के विजेची आवश्यकता हरित ऊर्जेद्वारे पूर्ण झालेली आहे.
- वरील प्रस्ताव हा ऐच्छिक स्वरूपाचा असेल आणि ग्राहकाला त्यातून हरित ऊर्जेचा पर्याय निवडण्याची संधी दिली जाईल.
- विशिष्ट ग्राहकाकडून नूतनक्षम ऊर्जा मिळवण्यासाठी आकारलेल्या अतिरिक्त शुल्कामुळे इतर ग्राहकांना आकारलेल्या किंमतीत वाढ होणार नाही.
- **हरित** ऊर्जेची १०० टक्के गरज पूर्ण करण्याच्या प्रयत्नांसाठी टाटा पॉवरवितरण अशा ग्राहकांना ''हरित ऊर्जा दर'' लागू करण्याचा प्रस्ताव देत आहे.
- टाटा पॉवर वितरणकडून पुढील नियंत्रण कालावधीसाठी प्रस्तावित हरित ऊर्जा कर खालीलप्रमाणे आहे-

| अनु क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १. | आरई आर्थिक वर्ष २१ ते आर्थिक वर्ष २५ साठी सरासरी खर्च (रू./किलोवॅट) | ३.८० |
| २. | बिगर आरईसाठी वर्ष २१ ते आर्थिक वर्ष २५ साठी सरासरी बदलता खर्च (रू./किलोवॅट) | ३.३१ |
| ३. | फरक (रू./किलोवॅट) | ०.४९ |
| ४. | पारेषण नुकसान | ३.१८% टक्के |
| ५. | वितरण नुकसान | १.०२% टक्के |
| ६. | एकूण गणन केलेला खर्च (रू./किलोवॅट) | ०.५१ |
| ७. | इतर प्रशासकीय खर्च (रू./किलोवॅट) | ०.०५ |
| ८. | हरित ऊर्जा खर्च (रू./किलोवॅट) | ०.५६ |

- आपल्यासाठी १०० टक्के हरित ऊर्जेचा पर्याय निवडणाऱ्या ग्राहकांना खटला क्रमांक २०१९ चा ३२६ आदेशामधील दर अधिक हरित ऊर्जा शुल्क आकारण्यात येईल.

४. खालील कागदपत्रांच्या प्रती टाटा पॉवर-डीच्या खाली नमूद केलेल्या कार्यालयांमधून लेखी विनंतीद्वारे प्राप्त करता येतील:
   a. याचिकेची सीडीसह तपशीलवार कागदपत्रे (इंग्रजीमध्ये) (१५० रूपये रोख/ डीडी/ धनादेशाद्वारे प्रदान करून) ''**दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड**''च्या नावे जारी केलेले मुंबई येथे देय धनादेश.
   b. याचिकेची तपशीलवार कागदपत्रे (इंग्रजीमध्ये) (१०० रूपयांचे प्रदान करून).
   c. याचिकेच्या तपशीलवार कागदपत्रांची सीडी (इंग्रजीमध्ये) (५० रूपयांचे प्रदान करून).

५. कार्यालयीन दिवसांमध्ये सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या काळात याचिकेची प्रत ज्या पत्त्यावरून प्राप्त करता येईल तो पत्ता आणि संपर्क तपशील-
   a. नाव - श्रीमती ए. डांगी
   b. पत्ता- दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड, शालिमार इंडस्ट्रियल इस्टेट जवळ , माटुंगा (पश्चिम), मुंबई - ४०००१९

६. आयोगाने टाटा पॉवर- वितरणला सदर सूचनेद्वारे वरील याचिकेबाबत जनतेकडून आक्षेप/ सूचना मागवण्यासाठी निर्देश दिले आहेत. आक्षेप/ सूचना **२३ जानेवारी २०२१** पर्यंत **सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३वा मजला, सेंटर क्रमांक १, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई- ४००००५ [ehearing@merc.gov.in/ secretary@merc.gov.in]** यांच्याकडे सेवेच्या पुराव्यांसह श्री. पियूष टंडन, दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड, बॅकबे रिसिव्हिंग स्टेशन, १४८ लेफ्टनंट जनरल जे. भोसले मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई- ४०००२१ (इमेल: peyush.tandon@tatapower.com, दूरध्वनी: (९१ २२) ६७१७२९०१) येथे पाठवले जाऊ शकतात.

७. प्रत्येक व्यक्तीला ज्यांना आक्षेप/ सूचना दाखल करायच्या आहेत ते इंग्रजी किंवा मराठीत सहा प्रतींमध्ये किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून पाठवता येतील आणि त्यासोबत पाठवणाऱ्याचे पूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता आणि इ-मेल पत्ता असल्यास नमूद करण्यात यावा. सदर आक्षेप/ सूचना संस्था किंवा ग्राहकांच्या वर्गवारीच्या वतीने पाठवण्यात आली आहे का हे नमूद करण्यात यावे. पाठवणाऱ्या व्यक्तीला वैयक्तिक सुनावणी हवी आहे का हेही त्यात नमूद करण्यात यावे. या संदर्भात आयोग पूर्ण स्वेच्छाधिकाराने अशा पाठवणाऱ्या व्यक्तीला / आक्षेप घेणाऱ्या व्यक्तीला ई-सार्वजनिक सुनावणीत सुनावणीची परवानगी देऊ शकतील.

८. ई-सार्वजनिक सुनावणीत सहभागी होणाऱ्यानी १७ सप्टेंबर २०२० रोजी अधिसूचित केलेल्या व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सार्वजनिक सुनावणीत उपस्थित राहण्याच्या आयोगाच्या तरतुदींचे पालन करावे.

९. टाटा पॉवर-वितरण प्रत्येक आक्षेप/ सूचना यांना त्यांच्या प्राप्तीच्या तारखेपासून दोन दिवसांत उत्तर देईल परंतु **२३ जानेवारी २०२१** पर्यंत प्राप्त झालेल्या सर्व आक्षेप/ सूचनांसाठी **२५ जानेवारी २०२१** पेक्षा अधिक काळ लागणार नाही. भागधारक टाटा पॉवर-वितरणने दिलेल्या उत्तरांना आपली जोडपत्रे सार्वजनिक सुनावणीदरम्यान किंवा **३० जानेवारी २०२१** पर्यंत पाठवू शकतात.

१०. तपशीलवार याचिका दस्तऐवज टाटा पॉवर कंपनीच्या वेबसाइटवर म्हणजे **https://www.tatapower.com/corporate/regulatory/regulatory-mumbai.aspx** येथे उपलब्ध आहे आणि ती आयोगाच्या वेबसाइटवर म्हणजे **www.merc.gov.in** येथेही डाऊनलोड करण्यायोग्य स्वरूपात (मोफत) उपलब्ध आहे.

११. सुनावणी **२७ जानेवारी २०२१ रोजी सकाळी १०.३०** वाजता व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे आयोजित केली जाईल. त्यासाठी कोणतीही स्वतंत्र सूचना दिली जाणार नाही.

**टाटा पॉवर कंपनी लिमिटेडसाठी**

**स्थळ : मुंबई**

**(पियूष टंडन)**
**प्रमुख- नियामक**

**तारीख: ३ जानेवारी,२०२१**